महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । सोमवार, २ सप्टेंबर २०१९

१२० टन कचरा, गाळाची उचल

पालिकेच्या स्वच्छता मोहिमेत १२५ विद्यार्थ्यांचा सहभाग

शाहूपुरी कुंभार गल्ली परिसरात रविवारी स्वच्छता मोहीम राबविली.

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

गणरायाच्या आगमनाची सर्वत्र धामधूम सुरू असताना रविवारी महापालिकेच्या वतीने घेतलेल्या स्वच्छता मोहिमेत तब्बल १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सामाजिक कार्यकर्ते व विद्यार्थ्यांनी तब्बल १२० टन कचरा व गाळाची उचल केली. शाहूपुरी कुंभार गल्लीतील पुलावरील मोठ्याप्रमाणात गाळ काढून औषध फवारणी करण्यात आली.

महापालिका प्रशासनाच्या वतीने दर रविवारी स्वच्छता मोहीम घेतली जाते. सलग एकोणिसाव्या रविवारी गणरायाच्या आगमनानिमित्त शाहूपुरी कुंभार गल्लीमध्ये स्वच्छता घेण्यात आली. मोहिमेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विवेकानंद, कॉमर्स व राजर्षी शाहू कॉलेजच्या एनसीसी व एनएसएसच्या १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्याचबरोबर बचत गट व सामाजिक स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

सोमवारी गणेशमूर्ती नेण्यासाठी कुंभार गल्लीत भाविकांची गर्दी होणार असल्याने येथील स्वच्छतेला प्राधान्य देण्यात आले. त्यानंतर लक्ष्मीपुरी, कामगार चाळ, फोर्ड कॉर्नर, विल्सन पूल, दसरा चौक, जयंती नाला, पंचगंगा घाट नदी परिसर, सुतार वाडा, गाडी अड्डा, कोरे हॉस्पिटल व कदमवाडी येथे मोहीम राबविली. गोळा केलेला कचरा प्रत्येकी दहा डंपर, ट्रॅक्टर ट्रॉली व ८१ टिपरमधून वाहतूक करण्यात आली. स्वच्छतेनंतर येथे धूर व औषध फवारणी करण्यात आली.

आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, सहायक आयुक्त संजय सरनाईक, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विजय पाटील, पर्यावरण अधिकारी समीर व्याघ्रांबरे, मुख्य आरोग्य निरिक्षक जयवंत पवार यांच्यासह आरोग्य विभागाचे २०० कर्मचारी उपस्थित होते.

पुढारी कोल्हापूर, सोमवार, २ सप्टेंबर २०१९

तलवारबाजी स्पर्धेत विवेकानंद कॉलेजचे वर्चस्व

कोल्हापूर : प्रतिनिधी

महानगरपालिका व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि कोल्हापूर फेन्सिग असोसिएशन आयोजित मनपास्तर शालेय तलवारबाजी क्रीडा स्पर्धेत विवेकानंद कॉलेजच्या खेळाडूंनी वर्चस्व राखले.

विभागीय क्रीडा संकुलावर झालेल्या स्पर्धेचा सविस्तर अनुक्रमे निकाल असा : १४ वयोगट मुले : फॉईल प्रकार : ऋषिकेश पोवार (विद्यापीठ हायस्कूल), धैर्यशील पाटील (कर्मवीर इंग्लिश मीडियम), ऋतुराज मोहिते (न्यू मॉडेल इंग्लिश स्कुल), आदर्श पाटील (न्यु मॉडेल इंग्लिश स्कूल). इपी प्रकार : स्वयंम पोवार (न्यू मॉडेल स्कूल), ऋषिकेश पोवार (विद्यापीठ हायस्कूल), मंथन कांबळे (सेंट झेवियर्स हायस्कूल), चंद्रदीप स्वामी (कर्मवीर इं. स्कूल). सेबर प्रकार : साईराज पाटील (न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल).

१४ मुली : फॉईल प्रकार : मैत्रेयी पाटील (शांतिनिकेतन स्कूल), प्राची पाटील (कर्मवीर इं. स्कूल), वैदेही कुरणे (न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल), मानसी शिंदे (कर्मवीर इं. स्कूल). सेबर प्रकार : परिणीता वरूटे (सेंट झेवियर्स), निर्मला थापा (कर्मवीर स्कूल), हर्षदा संकपाळ (कर्मवीर इं. स्कूल), मानसी कोरडे (कर्मवीर इं. स्कूल). **१७ मुले : फॉईल प्रकार :** श्रीशैल शिंदे (महावीर इंग्लिश स्कूल), इंद्रनील भोसले (विवेकानंद कॉलेज), जयेश

आजगावकर (कर्मवीर इं. स्कूल), ओंकार जाधव (कर्मवीर इं. स्कूल). इपी प्रकार : ओम सराफ (कर्मवीर इं. स्कूल), इंद्रनील भोसले (विवेकानंद कॉलेज), अनिकेत साळोखे (छ. शाहू हायस्कूल), अतिष कुमावत, कर्मवीर इं. स्कूल). सेबर प्रकार : श्रीशैल शिंदे, महावीर इं. स्कूल, यश बोरवडेकर (न्यू मॉडेल), ऋषिकेश कुंभार (कर्मवीर इं. स्कूल).

१७ मुली : फॉईल प्रकार : अंकिता सुर्वे (विवेकानंद कॉलेज), स्वरूपा पाटील (न्यू कॉलेज), निहारिका बोंगाळे (कर्मवीर इं.स्कूल), देवयानी कांबळे (कर्मवीर इं. स्कूल). इपी प्रकार : अंकिता सुर्वे (विवेकानंद कॉलेज), नेहा सरनोबत (राधाबाई शिंदे स्कूल), स्वरूपा पाटील (न्यू कॉलेज), मलीशा जाधव , विवेकानंद कॉलेज. सेबर प्रकार : नेहा सरनोबत (राधाबाई शिंदे स्कूल).

१९ मुले : फॉईल प्रकार : श्रावण काटकर (महावीर कॉलेज), अंशू काशीद (स.म.लोहिया कॉलेज). इपी प्रकार : अंशू काशीद (स. म. लोहिया कॉलेज). सेबर प्रकार : प्रज्वल कुंभोजे (विवेकानंद कॉलेज), श्रावण काटकर (महावीर कॉलेज).

१९ मुली : फॉईल प्रकार सानिका मोरे (विवेकानंद कॉलेज), श्लोका शिंदे (विवेकानंद कॉलेज), तानिया दास (विवेकानंद कॉलेज), संजना घोरपडे (विवेकानंद कॉलेज). इपी प्रकार : संजना घोरपडे (विवेकानंद कॉलेज), सिद्धी जाधव (न्यु मॉडेल), राजक्ता पाटील (विवेकानंद कॉलेज), नम्रता केबले (विवेकानंद कॉलेज). सेबर प्रकार : श्लोका शिंदे (विवेकानंद कॉलेज), सानिका मोरे (विवेकानंद कॉलेज), वैष्णवी पाटील (विवेकानंद कॉलेज). संयोजन राज्य क्रीडा मार्गदर्शक प्रवीण कोंढावले, क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, संदीप जाधव यांनी केले.

महास्वच्छतेत विद्यार्थ्यांचा सहभाग

कोल्हापूर : प्रतिनिधी

कोल्हापूर शहरात रविवारी सकाळी सात वाजल्यापासून महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. या मोहिमेचा हा एकोणीसावा रविवार होता. या अभियानामध्ये विवेकानंद कॉलेज एनसीसी व एनएसएसचे १२५ विद्यार्थी विद्यार्थिनी, कॉमर्स कॉलेजचे ३० विद्यार्थी, विद्यार्थिनी, राजर्षी शाहू कॉलेजचे एनसीसी, एनएसएसचे १०० विद्यार्थी विद्यार्थिनींनी व स्वरा फाऊंडेशनचे २० कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला

कोंडा ओळ व कदमवाडी येथे कॉमर्स कॉलेज, शाहू कॉलेज व विवेकांनद कॉलेज एनएसएसचे विद्यार्थी विद्यार्थिनींना आयुक्त डॉ. कलशेट्टी यांनी स्वच्छतेची शपथ दिली. मोहिमेत लक्ष्मीपुरी, कामगार चाळ, रिलायन्स मॉल मागे, फोर्ड कॉर्नर, व्हिल्सन पूल, दसरा चौक, संप आणि पंप, पंचगंगा घाट नदी परिसर, कुंभार गल्ली, सुख सागर हॉटेल, शाहूपुरी सहावी गल्ली, सुतार वाडा, गाडी अड्डा, कोरे हॉस्पिटल, संभाजी पूल परिसर, कदमवाडी या परिसरातील स्वच्छता करण्यात आली.

यावेळी सहा जेसीबी, दहा डंपर व ट्रॅक्टर ट्रॉली, ८१ टिप्पर व महापालिकेच्या २०० सफाई कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने १२० टन कचरा व गाळाचा उठाव करण्यात आला. स्वच्छता केलेनंतर रोगराई पसरू नये, यासाठी या परिसरात धूर व औषध फवारणी, ब्लिचिंग पावडर टाकण्यात आली. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या उपस्थितीत झालेल्या या मोहिमेत महापालिका व सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

कोल्हापूर : महापालिकेतर्फे रविवारी शहरात स्वच्छता मोहीम झाली. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्यासह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

सकाळ
सोमवार, २ सप्टेंबर २०१९

उज्ज्वल भविष्यासाठी विवेकी विचारांची गरज

प्रा. कृष्णात स्वाती; 'विवेकानंद'मध्ये विवेक वाहिनीचे उद्‌घाटन

कसबा बावडा, ता. १ : ''विवेकी शिक्षणातून माणूस सुशिक्षित बनण्याबरोबरच सुसंस्कृत आणि विवेकीवादी बनणे गरजेचे आहे. विवेक वाहिनीच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो व या विवेकी विचारातून समाज परिवर्तन होते. त्यासाठी प्रत्येकाने आपला स्वतःचा, कुटुंबाचा, समाजाचा विकास करण्यासाठी कृतिशील राहिले पाहिजे,'' असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य सरचिटणीस प्रा. कृष्णात स्वाती यांनी केले. ते विवेकानंद कॉलेजच्या महाराष्ट्र विवेक वाहिनीच्या उद्‌घाटन समारंभाप्रसंगी बोलत होते.

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये विवेक वाहिनीच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना प्रा. कृष्णात स्वाती. शेजारी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, विवेक वाहिनीचे समन्वयक प्रा. डी. एम. पन्हाळकर.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर म्हणाले, ''आपला विकास आपल्याच हाती आहे. त्यासाठी सर्वांनी पहिल्यांदा आपले कर्तव्य केले पाहिजे, नंतर हक्क मागितला पाहिजे, असा विचार समाजात रुजविला पाहिजे. विवेक वाहिनीच्या माध्यमातून समाजात विवेकी विचारांची चळवळ उभी केली जात आहे.''

समन्वयक प्रा. डी. एम. पन्हाळकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एस. एस. काळे यांनी आभार मानले. संयोगिता पाटील हिने सूत्रसंचालन केले. यावेळी प्रा. एस. व्ही. मालगावकर, डॉ. सरिता शिंदे, धर्मराज कांबळे उपस्थित होते.

तरुण भारत ■ सोमवार, २ सप्टेंबर २०१९

महाविद्यालयीन विद्यार्थी शहर स्वच्छतेसाठी सरसावले

१२० टन कचरा, गाळ उठाव : अखंड १९ व्या रविवारी महास्वच्छता

कोल्हापूर : पूर ओसरलेल्या परिसराची स्वच्छता करताना महाविद्यालयीन विद्यार्थी, सोबत सामाजिक संघटना. शहर स्वच्छतेचा संकल्प केलेल्या मनपा आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी स्वच्छता केली.

प्रतिनिधी
कोल्हापूर

महापालिकेच्यावतीने आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या संकल्पनेतून शहरामध्ये दर रविवारी महास्वच्छता अभियान राबविले जात आहे. १९ व्या रविवारी (१ सप्टेंबर) ही मोहीम कायम होती. यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग लक्षणीय होता. कॉमर्स, विवेकानंद व शाहू कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पूर ओसरल्या परिसराची स्वच्छता केली. दिवसभरामध्ये १२० टन कचरा, गाळ व प्लॅस्टिक गोळा करण्यात आले.

यावेळी कोंडा ओळ व कदमवाडी येथे कॉमर्स कॉलेज, शाहू कॉलेज व विवेकांनद कॉलेज एनएसएसचे विद्यार्थी विद्यार्थींनी स्वच्छता केली. तत्पुर्वी आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यानी त्यांना स्वच्छतेची शपथ दिली. यानंतर लक्ष्मीपूरी, कामगार चाळ, रिलायन्स मॉल मागे, फोर्ड कॉर्नर, व्हिल्सन पूल, दसरा चौक, संप आणि पंप, पंचगंगा घाट नदी परिसर, कुंभार गल्ली, सुख सागर हॉटेल, शाहूपूरी ६ वी गल्ली, सुतार वाडा, गाडी अड्डा, कोरे हॉस्पिटल, संभाजी पूल परिसर, कदमवाडी या परिसराची स्वच्छता करण्यात आली.

यावेळी ६ जेसीबी, १० डंपर, १० ट्रॅक्टर ट्रॉली, ८१ टिप्पर व महापालिकेच्या २०० सफाई कर्मचाऱ्यांच्या मदतीने ही स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. रोगराई पसरु नये यासाठी या परिसरात धूर व औषध फवारणी, ब्लिचिंग पावडर टाकण्यात आली. एनसीसी व एनएसएसचे १२५ विद्यार्थी विद्यार्थीनी, कॉमर्स कॉलेजचे ३० विद्यार्थी विद्यार्थीनी, राजर्षी शाहू कॉलेजचे एनसीसी, एनएसएसचे १०० विद्यार्थी विद्यार्थीनीनी व स्वरा फौंडेशनचे २० कार्यकर्ते यांनी सहभाग नोंदविला.

यावेळी सहायक आयुक्त संजय सरनाईक, पशुवैद्यकीय अधिकरी डॉ.विजय पाटील यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले. यावेळी पर्यावरण अधिकारी समीर व्याघ्रांबरे, जयवंत पवार, राहुल राजगोळकर, निखिल पाडळकर, उदय गायकवाड, दिलीप देसाई आदी उपस्थित होते.